


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

बुलडाणा, बुधवार, दि.०४ जून २०२५

वर्ष : ०४, अंक : २९३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

# 'आयपीएल २०२५' ट्रॉफीवर बँगलोरने कोरले नाव ! पंजाबची झुंज अपयशी !!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, अहमदाबाद :** आरसीबीने अखेर १८ व्या वर्षी आयपीएलची ट्रॉफी जिंकली आणि विराट कोहलीचे स्वप्न साकार झाले. आरसीबीने पंजाब किंग्सवर आयपीएलच्या फायनमलध्ये विजय ६ धावांनी साकारला आणि त्यांनी प्रथम विजेतेपदाला गवसणी घातली. आरसीबीने प्रथम फलंदाजी करताना १९० धावा केल्या होत्या. आरसीबीच्या आव्हानाचा पाठलाग करताना पंजाबची सुरुवात चांगली झाली असली तरी त्यानंतर त्यांचे फलंदाज ठराविक फरकाने बाद होत राहीले. त्यामुळे हा सामना कोण जिंकेल, हा प्रश्न सर्वांनाच पडला होता. पण आरसीबीने त्यानंतर अचूक आणि भेदक मारा करत सामन्यावर वरचष्मा ठेवला होता.






आरसीबीच्या १९१ धावांचा पाठलाग करताना पंजाबने सुरुवात चांगली केली होती. त्यांना ४३ धावांची सलामी दिली. पण त्यानंतर त्यांचे फलंदाज एकामागून एक बाद होत गेले आणि पंजाबच्या हातून सामना निसटतो की काय, असे वाटायला लागले. गेल्या सामन्यात पंजाबच्या विजयाचा हिरो ठरलेला श्रेयस अय्यर या सामन्यात पुरता अपयशी ठरला. कारण यावेळी त्याला फक्त एकच धाव करता आली.

आरसीबीच्या संघाने चांगली सुरुवात केली खरी, पण विराट कोहलीची बॅट मात्र शांत होती. फिल सॉल्ट मात्र यावेळी दमदार फटकेबाजी करत होता. पण सॉल्टवर धावगतीचं दडपण वाढलं आणि मोठा फटका मारताना तो १६ धावांवर बाद झाला. त्यानंतर फलंदाजीला आला तो मयांक अगरवाल. यावेळी मयांकनेही सुरुवातीपासून जोरदार फटकेबाजी केली, तो २४ धावांवर बाद झाला. त्यानंतर आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदार फलंदाजीला आला आणि त्यानेही संघाची धालगीत वाढवण्याचा प्रयत्न केला. रजतने यावेळी २६ धावा केल्या. लायम लिव्हिंगस्टोन २५ आणि जितेश शर्मा २४ यांनीही उपयुक्त फलंदाजी केली. पण एकिकडे हे फलंदाज मोठी फटकेबाजी करत असले तरी आरसीबीचा धावसंख्या मात्र हवी तशी वाढत नव्हती आणि त्याला कारण ठरत होते विराट कोहलीचा सावध फलंदाजी. आरसीबीचा संघ फायनलमध्ये २०० धावा करण्याच्या तयारीत दिसत होता. आरसीबी सहजपणे हा पल्ला गाठेल, असे वाटत होते. पण विराट कोहलीच्या सावध पवित्र्यामुळे ते शक्य होऊ शकले नाही. कारण विराट कोहलीने ४३ धावा केल्या असल्या तरी त्यासाठी त्याने ३५ चेंडू खेळले आणि त्याच्या या खेळीत एकही षटकार नसला तरी फक्त तीनच चौकार होते. त्यामुळे आरसीबीला या सामन्यात १९० धावा करता आल्या.

**कोहलीचं 'विराट' स्वप्न पूर्ण RCB ची बॅटिंग कशी झाली?**

त्यापूर्वी आरसीबीनं पहिल्यांदा बॅटिंग करताना निर्धारित २० ओव्हर्समध्ये ९ आऊट १९० रन्स केले. आरसीबीकडून एकालाही हाफ सेंच्युरी झळकावता आली नाही. विराट कोहलीनं (तळऑरीं घेहश्रळ) सर्वात जास्त ४३ रन्स केले.

आरसीबीकडून फिल सॉल्टनं १६, रजत पाटीदारनं २६, मयांक अग्रवालनं २४ रन्स केले. लियाम लिव्हिंगस्टोननं १५ बॉलमध्ये २५ रन केले. या दोघांनी वेगानं रन्स करत वेगानं रन वाढवण्याचा प्रयत्न केले. पण, आरसीबीच्या एकाही बॅटरला मोठा स्कोर करता आला नाही.

पंजाब किंग्जकडून अर्शदीप सिंग आणि जेमीसननं प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या. तर ओमरझाई, विजयकुमार आणि चहलनं प्रत्येकी १ विकेट घेतली.

## थोडक्यात

### नाशिकमधील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तारखा जाहीर १८ महिने चालणार कुंभमेळा...

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**



**दि.०३, विंचूर (नाशिक) :** नाशिकमधील त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याचे ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी ध्वजारोहण होणार आहे. हा भव्य धार्मिक सोहळा तब्बल १८ महिने म्हणजेच ३१ ऑक्टोबर ते जुलै दरम्यान नाशिकमधील त्र्यंबकेश्वर येथे संपन्न होणार आहे. या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तारखा जाहीर झाल्या आहेत.

कुंभमेळा अधिक दीर्घकालीन आणि नियोजित स्वरूपात पार पडणार आहे. यामध्ये ३ मुख्य शाही स्नान आणि ४२ पर्व स्नान समाविष्ट असणार आहेत. शाही स्नान जुलै ते सप्टेंबर दरम्यान दीड महिन्याच्या कालावधीत पार पडणार आहेत. २९ जुलै २०२७ रोजी नगर प्रदक्षिणा होईल. तर पहिले अमृतस्नान हे सोमवारी, २ ऑगस्ट २०२७ रोजी पहिले शाही स्नान होणार आहे. तर या महाकुंभातील दुसरं अमृतस्नान ३१ ऑगस्ट २०२७ रोजी होणार आहे. तर तिसरं आणि शेवटचं अमृतस्नान हे ११ सप्टेंबर २०२७ रोजी नाशिक येथे होईल.

कुंभमेळा नियोजन संदर्भात होणाऱ्या बैठकीत कुंभमेळा मध्ये होणाऱ्या अमृत्स्नान तारखा जाहीर.

**–त्रंबकेश्वर अमृतस्नान तारीख जाहीर –**

ध्वजारोहण करून कुंभ पर्वाला सुरुवात.
पहिले अमृतस्नान – २/८/२०२७
द्वितीय अमृतस्नान –३१/८/२०२७
तृतीय अमृतस्नान – १२/९/२०२७

**– नाशिक कुंभ अमृतस्नान –**

३१/१०/२०२६
ध्वजारोहण करून कुंभ पर्वाला सुरुवात.
पहिले अमृतस्नान – २/८/२०२७
द्वितीय अमृतस्नान – ३१/८/२०२७
तृतीय अमृतस्नान – ११/९/२०२७

### आज ठाण्याच्या काही भागात पाणी पुरवठा बंद

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.०३, ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या स्वतःच्या पाणी पुरवठा योजनेतील टेम घर जल शुद्धीकरण केंद्रातील उच्च दाब उपकेंद्रातील पावसाळ्या पूर्वीची अत्यावश्यक देखभाल, कंट्रोल पॅनलची दुरुस्ती, ट्रान्सफॉर्मर ऑईल फिल्ट्रेशन आदी कामे बुधवार ०४ जून रोजी करण्यात येणार आहेत. त्यामुळे, बुधवार, ०४ जून रोजी स ९.०० ते रा. ९.०० या काळात १२ तासांसाठी पाणीपुरवठा बंद राहणार आहे. परिणामी, बुधवार ०४ जून रोजी स. ९.०० ते रा. ९.०० वाजेपर्यंत घोडबंदर रोड, वर्तक नगर, ऋतू पार्क, जेल, गांधी नगर, रुस्तमजी, सिध्दांचल, समता नगर, सिध्देश्वर, इंटरनिटी, जॉन्सन आणि कळव्याचा काही भाग येथे १२ तासासाठी पाणी पुरवठा पूर्णपणे बंद राहील. इतर भागात, स्टेम प्राधिकरणामार्फत येणारा पाणी पुरवठा झोनिंग करुन सुरू ठेवण्यात येणार आहे.

दरम्यान, पाणीपुरवठा पूर्व पदावर येईपर्यंत पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणी येण्याची शक्यता आहे. तरी, नागरिकांनी पाण्याचा योग्य तो साठा करुन ठेवावा, पाण्याचा अपव्यय करू नये, असे आवाहन ठाणे महानगरपालिकेने केले आहे.

## पारनेर तालुक्यात शेती मशागतीची लगबग ; खरीप हंगामाची कामे वेगात

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३, पारनेर (अहिल्यानगर) :** संपूर्ण तालुक्यासह जिल्हाभर सतत महिनाभर चाललेल्या अवकाळीने पाच सहा दिवसापासून उसंती घेतल्याने रखडलेल्या खरिपाच्या मशागतीच्या कामांची लगबग सुरू असल्याचे चित्र तालुक्यात दिसत आहे.



संपूर्ण मे महिना अवकाळीने थैमान घातल्याने खरिपाच्या हंगामासाठी मशागतीचे गणित पूर्ण बिघडून गेले असताना तोंडावर असलेल्या हंगामी पिकांसाठी धोक्याची घंटा समजले जात होते. काही शेतकरी मोठ्या प्रमणात कांदा काढणीच्या कामात व्यस्त असल्याचे चित्र दिसून येत होते. काहींना मजूर टंचाईची समस्या जाणवत असल्याने शेतातील कांदा पिक काढणीला उशीर झाल्याने अवाढव्य खर्च करून पिकविलेला शेकडो एकरवरील लाखो रुपयांचा माल अवकाळी पावसाच्या पाण्यात बुडाला.

त्यामुळे काहीका होईना होईल तितके प्रयत्न करून कांदा उत्पादक शेतकरी कांदा काढणीच्या कामातच अडकलेला दिसून येत होता. त्याच कालावधीत मोठ्या प्रमाणावर कांदा, कोबी, फ्लॉवर झेंडू, टमटो व इतर भाजीपाला पिकांचेही नुकसान झाले आहे. त्यामुळे आजच्या घडीला मशागतीसाठी बैलांऐवजी ट्रॅक्टरसारख्या यंत्राचा वापर केला जात आहे. शेतकऱ्यांना मशागतीसाठी ट्रॅक्टरची मजुरी आणि मूग, कांदा, बाजरी, सोयाबीन,मका, भुईमूग उडीद इतर बियाणे खरेदी करणे मोठे जिकिरीचे ठरत आहे. परंतु कोणत्याही परिस्थितीत पुढील पिकांसाठी मशागत करणे महत्त्वाचे असल्याने शेतकरी धावपळ करताना दिसत आहेत.

## चंद्रपुरात ५ व ६ जुन रोजी वनक्षेत्रातील महिलांची राष्ट्रीय परिषद

### वन क्षेत्रात कार्यरत देशभरातील महिलांचे विविध विषयांवर मंथन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, चंद्रपूर :** महाराष्ट्र वन विभागाद्वारे 'वनक्षेत्रातील महिला' या विषयावर चंद्रपूर वन प्रशासन विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी येथे ५ व ६ जून रोजी 'वनशक्ती २०२५' या वनक्षेत्रातील महिलांच्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवसीय या परिषदेमध्ये वन क्षेत्रात कार्यरत देशाच्या विविध भागांमधील महिला चर्चासत्रात उपस्थिती दर्शविणार आहेत. ५ जून रोजी सकाळी १०.३० वाजता राज्याचे वन मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होईल.




कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून राज्याचे आदिवासी विकास विभाग मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके, खा. नामदेव किरसान, खा. प्रतिभा धानोरकर, आ. अभिजीत वंजारी, आ. सुधाकर अडबाले, आ. सुधीर मुनगंटीवार, आ. विजय वडेट्टीवार, आ. किर्तीकुमार भांगडिया, आ. किशोर जोरगेवार, आ. देवराव भोंगळे, आ. करण देवतळे, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलींद म्हैसकर, तेलंगणाच्या वन बल प्रमुख श्रीमती सुवर्णा यांची उपस्थिती असेल. उद्घाटनानंतर ५ जून रोजीच्या पहिल्या चर्चासत्रात पद्मश्री 'बीज माता' राईबाई पोपेरे, कर्नाटक वन विभागाचे सेवानिवृत्त वनअधिकारी मधू शर्मा, मोहर्लीच्या सरपंच सुनीता काटकर, बांबू क्षेत्रातील सामाजिक उद्योजक मिनाक्षी वाळके या सहभागी होतील. या चर्चासत्राचे नेतृत्व केंब्रिज विद्यापीठाच्या पीएच.डी स्कॉलर प्रेरणा बिंद्रा करतील. दुसऱ्या चर्चासत्रात आंध्रप्रदेश वन विभागाच्या सेवानिवृत्त विशेषज्ञ प्रधान मुख्य वनसंरक्षक सी. एस. रामलक्ष्मी, तेलंगणा वन विभागाच्या सुनीता भागवत आणि शिवानी डोगरा, केरळ वन विभागाच्या सेवानिवृत्त प्रधान मुख्य वनसंरक्षक प्रकृती श्रीवास्तव, मध्यप्रदेश वन विभागाच्या सेवानिवृत्त अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक डॉ. गोपा पांडे या सहभागी होतील. तेलंगणा वन विभागाच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि वन दल प्रमुख शोभा रॉयुरू या चर्चासत्राचे नेतृत्व करतील.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी ६ जून रोजीच्या चर्चासत्रात आरईएसक्यू चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष नेहा पंचमिया, गुजरात वन विभागाच्या रेंज फॉरेस्ट ऑफिसर रसिलाबेन वाढेर, मध्य प्रदेश वन विभागातील पन्ना व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्र संचालक अंजना तिर्की, पर्यावरण पत्रकार आणि संवर्धन जीवशास्त्रज्ञ बहार दत्त सहभागी होतील. दोन दिवसीय 'वनशक्ती २०२५' परिषदेमध्ये श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी बोटॅनिकल गार्डन, विसापूर आणि ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाला भेट देण्यात येणार आहे. येथे गट चर्चा, सादरीकरण तसेच वन्यजीव व्यवस्थापन आणि वन्यजीव संवर्धनात महिलांची भूमिका समजून घेतली जाणार आहे.

या चर्चासत्रांचे उद्दिष्ट महिलांच्या वनक्षेत्रातील अनुभवांची देवाणघेवाण, नेतृत्वातील अडचणींची चर्चा, आणि वनक्षेत्रात महिलांच्या सहभागासाठी धोरणात्मक मार्गदर्शन तयार करणे आहे. प्रत्येक चर्चासत्रामध्ये की नोट भाषणे, पॅनेल चर्चा, आणि अनुभव शेअरिंग सत्रे आयोजित केली जातील. या सत्रांमध्ये महिलांच्या वनक्षेत्रातील नेतृत्व, मैदानी भूमिकांमध्ये कायदेशीर सशक्तीकरण, आणि वन्यजीव क्षेत्रातील सहभाग यासारख्या विषयांवर चर्चा होईल. या चर्चासत्रांद्वारे महिलांच्या वनक्षेत्रातील योगदानाची ओळख पटवून, त्यांना आवश्यक असलेल्या धोरणात्मक, कायदेशीर, आणि संरचनात्मक समर्थनाची गरज अधोरेखित केली जाईल.

परिषदेच्या शेवटी, महिलांच्या वनक्षेत्रातील सहभाग आणि नेतृत्व वाढवण्यासाठी एक धोरणपत्र तयार करण्यात येईल. चंद्रपूर वन अकादमीमध्ये होत असलेल्या या दोन दिवसीय परिषदेमध्ये सहभागी होण्यासाठी विदर्भ तसेच संपूर्ण राज्यातील महिलांनी मोठ्या संख्येत उपस्थित रहावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्याच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) शोमिता बिस्वास यांनी केले आहे.




## पद्मश्री अशोक सराफ

मराठी चित्रपट सृष्टीतील जेष्ठ विनोदी अभिनेते, विनोद सम्राट, चित्रपट सृष्टीचे मामा, पद्मश्री अशोक सराफ यांचा आज ७८ वा वाढदिवस. विनोदाचा हा सम्राट बघता बघता ७८ वर्षाचा झाला यावर रसिकांचा विश्वास बसणे कठीण असले तरी ते सत्य आहे. अशोक सराफ यांचा जन्म ४ जून १९४७ रोजी मुंबईत झाला. मूळचे बेळगावचे असणारे अशोक सराफ यांचे बालपण मुंबईतील चिखलवाडी भागात गेले. त्यांचे शिक्षण मुंबईतील डि. जि. टी विद्यालयात झाले. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी ययाती आणि देवयानी या नाटकात विदुषकाची भूमिका साकारली होती. दादा कोंडके यांच्या पांडू हवालदार या चित्रपटाद्वारे त्यांनी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. या चित्रपटातील त्यांनी साकारलेली इरसाल हवालदाराची भूमिका खूप गाजली. दादा कोंडके यांच्याच राम राम गंगाराम या चित्रपटात त्यांनी म्हमद्या खाटीक ही भूमिका साकारली. कारकिर्दीच्या सुरवातीलाच केलेल्या विनोदी भूमिका लोकप्रिय ठरल्याने त्यांना विनोदी भूमिकाच मिळत गेल्या आणि त्यांनीही त्या भूमिकांना न्याय देऊन प्रेक्षकांना खळखळून हसवले. ८० च्या दशकात लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या समवेत त्यांची जोडी जमली. पडद्यावरील अशोक सराफ आणि लक्षा या जोडीने मराठी चित्रपटसृष्टित अक्षरशः धुमाकूळ घातला. या दोघांनी एकत्र अभिनय केलेल्या अशी ही बनवाबनवी, धुमधडाका, दे दणादण यासारख्या चित्रपटांनी धमाल उडवून दिली. सचिन आणि महेश कोठारे या दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेले व अशोक सराफ यांनी अभिनय केलेले नवरी मिळे नवऱ्याला, आत्म विश्वास, गंमत जंमत, आयत्या घरात घरोबा शुभ मंगल सावधान, आई नंबर वन, एक शेर दुसरी सव्वाशेर , नवरा पावशेर, नवसाचा नवरा, आयडीयाची कल्पना हे चित्रपट देखील लोकप्रिय झाले. अशोक सराफ यांनी केवळ विनोदी भूमिकाच केल्या असे नाही तर काही गंभीर भूमिका देखील केल्या. वजीर चित्रपटात त्यांनी साकारलेला गंभीर राजकारणी भाव खाऊन गेला तर चौकट राजा चित्रपटातील त्यांनी साकारलेली सहृदय व्यक्तीची भूमिका लोकांच्या मनात घर करून गेली. अशोक सराफ यांनी अभिनय केलेले आई नंबर वन, आत्मविश्वास, नवरी मिळे नवऱ्याला, धुमधडाका, गंमत जंमत, माझा पती करोडपती, दे दणादण, एक डाव भुताचा, भुताचा भाऊ, शेजारी शेजारी, एक उनाड दिवस, अफलातून, गोंधळात गोंधळ, अशी ही बनवाबनवी, सगळीकडे बोंबाबोंब, आयत्या घरात घरोबा, कुंकू, घनचक्कर, वजीर, एकापेक्षा एक, अनपेक्षित, चंगू मंगू , शुभमंगल सावधान, आमच्या सारखे आम्हीच, बाळाचे बाप ब्रह्मचारी, प्रेम करूया खुल्लम खुल्ला, गोष्ट धमाल नाम्याची, पांडू हवालदार, राम राम गंगाराम, कळत नकळत, अरे संसार संसार, आपली माणसं, एक डाव धोबीपछाड, आयडीयाची कल्पना, साडे माडे तीन हे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट विशेष गाजले. त्यांनी केवळ मराठीच नाही तर हिंदी चित्रपटातही काम केले. करण अर्जुन, कुछ तुम कहो कुछ हम कहे, बडे घर की बेटी, बेटी नंबर वन, कोयला, गुप्त , संगदिल सनम, प्यार किया तो डरणा क्या?, जोरू का गुलाम, खूबसुरत, यस बॉस, सिंघम या हिंदी चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका विशेष लक्षात राहण्यासारख्या आहेत. हम पांच, टना टन टन, डोन्ट वरी, हो जायेगा, छोटी बडी बाते यासारख्या काही टीव्ही मालिका देखील त्यांनी केल्या. त्यांनी भूमिका केलेले हमीदा बाईची कोठी, अनधिकृत मनोमिलन, हे राम, कार्डिओग्राम, सारखं छातीत दुखतंय ही नाटकेही खूप गाजली. चित्रपट, टीव्ही, रंगमंच अशा तिन्हीं माध्यमातून त्यांनी आपल्या अभिनयाची मुशाफिरी केली. आपल्या कारकिर्दीत त्यांनी २०० हुन अधिक चित्रपटात भूमीका केल्या. रंजना, उमा भेंडे, प्रेमा किरण, निवेदिता जोशी, वर्षा उसगावकर, अश्विनी भावे, अलका कुबल, प्रिया बेर्डे, किशोरी शहाणे या आणि अशा अनेक अभिनेत्रींसोबत त्यांनी भूमिका केल्या. विशेष म्हणजे या सर्व अभिनेत्री त्यांना सेटवर मामा म्हणत. आज तर ते संपूर्ण चित्रपट सृष्टीचे मामा झाले आहेत. आज त्यांना अशोक मामा याच नावानेच ओळखले जाते. अशोक सराफ यांना अशोक मामा हे नाव कसे पडले हे पाहणे देखील रंजक आहे. एका चित्रपटाच्या सेटवर प्रकाश शिंदे नावाच्या कॅमेरामन सोबत त्यांची मुलगी येत असत. सेटवर आली की ती विचारत असे, हे कोण ? त्या कॅमेरामनने सांगितले हे अशोक सराफ पण तू यांना मामा म्हणायचे. त्या मुलीसोबत सेटवरील सर्वजण त्यांना मामा म्हणू लागले पुढे हेच नाव रुढ झाले आणि अशोक सराफचे अशोक मामा बनले. अशोक सराफ यांना नुकतेच पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांनी नुकताच त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान केला. अशोक मामांना पद्मश्री पुरस्कार मिळाल्यावर संपूर्ण महाराष्ट्रात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. जगभरातील मराठी माणसांनी त्यांना पद्मश्री मिळाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. अशोक मामांना अभिनयासाठी मिळालेला हा पहिला पुरस्कार नाही. याआधीही त्यांच्या अभिनयासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत मात्र ते नेहमी म्हणतात की प्रेक्षकांच्या मनात मी स्थान निर्माण करू शकलो हाच माझ्यासाठी सर्वोत्तम पुरस्कार आहे आणि ते सत्यही आहे. अशोक सराफ यांच्यावर मराठी प्रेक्षकांनी जितके प्रेम केले तितके कोणत्याच अभिनेत्यावर केले नसेल. जवळपास पाच दशके आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात आढळ स्थान निर्माण करून प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या या विनोदाच्या अभिनय सम्राटाला ७८ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! परमेश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना!! वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा अशोक मामा

# कृषी खाते : 'ओसाड' गावची पाटीलकी नाहीच नाही

**अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

शेती क्षेत्राचे जगाच्या तसेच भारतीय अर्थव्यवस्थेत आपले एक महत्व आहे, सर्वच देशात शेती संशोधनावर अभ्यास केला जातो, नवनवीन तंत्रज्ञान आणुन कृषी उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातात शेती करणारा बळीराजा हा जगाचा पोशिंदा आहे. आणि प्रत्येक देश आपल्या अर्थ संकल्पात शेती श्रेत्रासाठी तरतुद करतो, अनेक ठिकाणी शेती संशोधनासाठी संस्था निर्माण केल्या आहेत अनेक विद्यापीठात शेत संबधी अभ्यास केला जातो, शिकवला जातो. देशात देखील अनेक कृषी विद्यापीठ आहेत यावरूनच शेती श्रेत्राचे महत्व अधोरेखित होते. केंद्रात आणि राज्यात स्वतंत्र कृषी खाते आहे.कृषी मुल्य आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. शेती संबधी अभ्यासासाठी अनेक आयोग नेमले गेले आहेत.

अगदी अनपेक्षितपणे विधानसभा निवडणुकीनंतर माणिकराव कोकाटे यांना मंत्रीपदाची संधी मिळाली आणि कृषी खात्यासारख्या महत्त्वाच्या खात्यात काम करणाची संधी त्यांना मिळाली, वाटले होते ते संधीचे सोने करतील. ते अनुभवी राजकारणी आहेत चार पाच वेळा आमदार झाले आहेत, अनेक पक्ष फिरून आल्याने त्यांना पक्षीय राजकारणाचा देखील चांगला अनुभव आहे, त्यांनी वकिलीची परिक्षा पास केली आहे त्यामुळे त्यांच्या कडुन शेतकऱ्यांना खुप अपेक्षा आहेत. पाच वेळा आमदार झाले आहेत. मात्र दुर्दैवाने ते आपली जबाबदारी न ओळखता, आपल्या कर्तव्याची जाणीव न राखता ते मंत्री झाल्यापासूनच वाचाळविरासारखे वक्तव्ये करत आहेत. मंत्री होताच पिक विमा योजनेतील भ्रष्टाचाराबाबत प्रश्न विचारला तेव्हा अनावधानाने का होईना त्यांनी कुठल्याही योजनेत २-५ टक्के इतका भ्रष्टाचार मान्य केला नंतर टीका झाल्यावर घुमजाव केले. त्याचबरोबर एक रूपया भिकारी देखील घेत नाही पण आम्ही एक रूपयात पीक विमा देतो असे म्हणत असंवेदनशीलतेचा कळसच गाठला आहे, आणि कर्जमाफी दिली तर त्या पैशात लग्न करतात, साखरपुडा करतात आणि पाच दहा वर्षे कर्जमाफीची वाट पाहतात असे असमर्थनीय वक्तव्य केले.

माणिकराव एक रुपयात वीमा द्या अशी मागणी शेतकऱ्यांनी केली नव्हती तर मतांसाठी तुम्हीच ती योजना आणली आणि जरी शेतकऱ्यांला एक रुपया भरावा लागला तरी ऊर्वरित रक्कम ही सरकारच्या म्हणजेच जनतेच्या तिजोरीतूनच दिली जाते आणि पीक विम्याचे पैसे देतांना मात्र शेतकऱ्यांची क्रुर चेष्टा केली जाते आणि पीक विमा योजनेचे खरे लाभार्थी पीक विमा चालविणाऱ्या खाजगी कंपन्याच ठरतात, मालामाल होतात आणि त्यांना पाठबळ असते ते तुमच्या सारख्या राजकीय नेत्यांचे. शेतकऱ्यांच्या कळवळ्याचा आव आणायचा आणि आपले खिसे भरून घ्यायचे हेच आजवर होत आले आहे. आतातर जुनीच पिक विमा योजना लागू करण्यात आली आहे. त्या नंतर त्यांनी कर्जमाफी दिली तर त्या पैशात लग्न करतात, साखरपुडा करतात असे असमर्थनीय वक्तव्य केले.देशातील पहिली शेतकरी आत्महत्या विदर्भात चाळीस वर्षापूर्वी झाली होती तेव्हा पासून आत्महत्येचे सत्र सुरुच आहे, आजवर लाखो आत्महत्या झाल्या आहेत विदर्भ आणि मराठवाड्यात तर मोठ्याप्रमाणावर आत्महत्या होत आहेत, दिवसाला सात तू आठ आत्महत्या होत आहेत, आणि शेतकऱ्याला कुणीही वाली नाही. देशाच्या इतिहासात शेतकऱ्यांनी पहिला संप केला तो देखील पुरोगामी महाराष्ट्रातच. शेतकऱ्यांच्या मालाला ऊत्पनावर आधारित मुल्य मिळाले पाहिजे ही खरी गरज असतांना, स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याची गरज असतांना ते केले जात नाही आणि शेतकऱ्यांचे ऊत्पन दूप्पट केल्याचे दावे केले जातात, शेतकरी निधी चे ढोल बडवले जातात. गेल्या दहा वर्षांत ऊत्पन नाही मात्र ऊत्पादन खर्च दुप्पट झाला आहे. शेतकऱ्यांच्या मतांवर माणिकरावांसारखे अनेक नेते मोठे झाले मात्र शेतकरी मोठा झाला नाही.

हवामान बदलामुळे दरवर्षी अवकाळी पाऊस, वादळे येतात आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान करुन जातात आता देखील अवकाळी पावसाने संपूर्ण राज्यात धुमाकूळ घातला आहे, हाता तोंडाशी आलेल्या पीकाचे नुकसान पाहुन शेतकरी आत्महत्या करीत आहेत, कुणी गळफास घेऊन घेत आहे तर कुणी विष प्राशन करून आत्महत्या करत आहेत. अशावेळी राज्याचे कृषीमंत्री म्हणून माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, कृषी खात्याचे मंत्री म्हणून ठोस निर्णय, योजना आखायला हव्यात, आपल्या खात्यासाठी अधिकाधिक आर्थिक तरतुद कशी मिळेल यासाठी प्रयत्न करायला हवेत आणि बळीराजाला मदत करायला हवी हे मंत्री म्हणून त्यांच्याकडून अपेक्षित आहे. खुद्द नाशिक जिल्हाला अवकाळी पावसाचा फटका बसला आहे आणि शेतकरी अडचणीत सापडला आहे.यावेळी पहाणी करतांना आता ढेकळांचा पंचनामा करायचा का? घरात कांदा साठवला असेल तर त्याचा पंचनामा होणार नाही, मदत मिळणार नाही अशा प्रकारचे असमर्थनीय वक्तव्य त्यांनी केले. निकषात बसत नसल्याचे कारण पुढे केले जाते मात्र निकष बदलणे सरकारच्याच हातात आहे, शेतकरी ऊद्धस्त होत असेल तर निकष का बदलले जाऊ शकत नाहीत,मात्र तशी इच्छाशक्ती आणि मानसिकता राज्यकर्त्यांची असायला हवी. निकष म्हणजे काही ब्रम्ह वाक्य नाही. आता तर त्यांनी एक पाऊल पुढे टाकत कृषी खाते म्हणजे ओसाड गावची पाटीलकी असल्याचे म्हटले आहे.

वास्तविक कृषी खाते हे अत्यंत महत्त्वाचे खाते आहे, भारत हा कृषी प्रधान देश आहे बहुतांश जनता शेतीवर अवलंबून आहे, अन्न धान्य पिकविण्याचे काम जगाचा पोशिंदा बळीराजाच करतो. जगभर शेती श्रेत्राबाबत काम केले जात आहे, अभ्यास केला जात आहे. देशाच्या सकल राष्ट्रीय ऊत्पनात शेती श्रेत्र महत्त्वाची भूमिका बजावते, विकासात मोठे योगदान देते. ईच्छाशक्ती आणि मानसिकता असेल तर शेती श्रेत्रात खुप काही करण्यास वाव आहे आणि ती काळाची गरज देखील आहे. जाणते राजे पवार साहेब यांनी केंद्रात कृषी खाते मागुन घेतले होते आणि बरेच काही करून देखील दाखवले होते. देशातील शेतकऱ्यांची कर्जमाफी त्यांच्याच काळात झाली होती. अनेक शेतकरी पुत्र हे राजकारणी आणि राज्यकर्ते बनले आहे. शेतकऱ्यांच्या जिवावर मोठे झालेले नेते शेतकऱ्यांच्याच जिवावर ऊठत आहे याचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे. किमान मदत करता येच नसेल तर बेजबाबदार विधाने करून त्यांनी शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ तरी चोळु नये माणिकरावांना नशिबाने चांगली संधी मिळाली आहे त्यांनी संधीचे सोने करावे हिच शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

# भारतीय संस्कृतीला छेद देणारे 'घटस्फोट'

भारताला लाभलेली प्राचीन हिंदू संस्कृती हे भारताचे एक आगळे वैशिष्ट्य आहे. या संस्कृतीचा भाग असलेली विवाहसंस्था जगाच्या पाठीवर अन्यत्र कुठेही पाहायला मिळत नाही. विवाह पृथ्वीतलावर होत असले, तरी जोडीदाराच्या गाठी या स्वर्गातच बांधल्या जातात अशी समजूत भारतीयांत पूर्वापार चालत आली आहे. त्यामुळे घटस्फोट हा शब्द भारतीय शब्दकोशात कुठेही सापडत नाही. विवाह संस्काराच्या माध्यमातून सात जन्माची गाठ बांधली जाते, या संस्कारात देवाब्राह्मणांच्या साक्षीने जन्मभर एकमेकांशी प्रामाणिक राहण्याचे, एकमेकांची काळजी घेण्याचे वचन दिले आणि घेतले जाते. या पवित्र संस्काराने बद्ध झालेले उभयता आयुष्यात येणाऱ्या सुखदुःखाच्या प्रसंगांना नेटाने सामोरे जातात. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर एकमेकांना साथ देत संसाराचे गाडे हाकतात.

गेल्या काही वर्षांत भारतीय तरुणांवर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. भारतात वाढत जाणारे घटस्फोटांचे प्रमाणही याचीच फलश्रुती आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही, २०२१ साली देशाच्या कौटुंबिक न्यायालयांत घटस्फोटांचे ५ लाख खटले प्रलंबित होते. २०२३ साली हीच संख्या ८ लाखांपर्यंत पोहोचल्याचे एका अहवालातून समोर आले आहे. घटस्फोटाच्या खटल्यांत वर्षागणिक होत जाणारी वाढ भविष्यांत पश्चिमी देशांना मागे टाकू शकते अशी भीती निर्माण झाली आहे. दरवर्षी घटस्फोटांची जेव्हढी प्रकरणे न्यायालयात निकाली काढली जातात, तेव्हढीच किंबहुना त्याहून अधिक नवीन प्रकरणे न्यायालयांत नव्याने प्रविष्ट केली जातात. त्यामुळे येणाऱ्या काळात देशाची कुटुंबव्यवस्था संकटात येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. तरुण पत्नी पत्नी विभक्त झाल्याने सर्वाधिक परिणाम त्यांच्या अपत्यांवर होतात. अशा अपत्यांमध्ये एकलकोंडेपणा, द्वेष, चिडचिड करणे, सूडभावनेने वागणे यांसारखे दोष प्रकर्षाने दिसून येतात. घटस्फोटित पालकांची मुले नकळतपणे गुन्हेगारीकडे वळत असल्याचे निरीक्षणही अहवालात नोंदवण्यात आले आहे. पश्चिमी देशांच्या तुलनेने भारतात होणाऱ्या घटस्फोटांची टक्केवारी कमी असली, तरी आज या प्रकारांवर नियंत्रण आणले नाही, तर भविष्यात ती भीषण स्वरूप धारण करू शकते,ज्याचा परिणाम सामाजिक व्यवस्थेवर होऊ शकतो. विवाह करताना प्रत्येक मुलामुलीने आपल्या भावी आयुष्याबद्दल अनेक स्वप्ने रंगवलेली असतात या स्वप्नांचा चुराडा करणारा घटस्फोट कुणालाही नको असतो; मात्र तो आयुष्यात येण्यामागे कारणेही तितकी गंभीर असू शकतात.

शहरासारख्या ठिकाणी राहणाऱ्या जोडप्यांमध्ये ग्रामीण भागाच्या तुलनेत घटस्फोटांचे प्रमाण अधिक आहे. शहरी भागात राहणारे बहुतांश तरुण पती पत्नी दोघेही नोकरी किंवा व्यवसाय करणारे आणि बऱ्यापैकी धन कमावणारे असतात. कार्यालयात उच्च पदावर असताना इतरांकडून मिळणारा मानसन्मान, सुधारित राहणीमान यामुळे राहणीमानाचा आणि पदाचा काही प्रमाणात अहंकार निर्माण होऊ लागतो. घरी जोडीदाराकडूनही अशाच सन्मानाची अपेक्षा केली जाते. तो तितक्या प्रमाणात न मिळाल्यास लहान सहान प्रसंगांतून खटके उडू लागतात. खटक्यांचे रूपांतर वादात होते. कधी कधी हे वाद विकोपाला पोहोचतात. सातत्याने असे प्रसंग घडू लागल्यास जोडीदारासोबत राहणे नकोसे वाटू लागते. माघार घेण्याची सवय नसल्याने वितुष्ट वाढत जाऊन प्रकरण घटस्फोटापर्यंत पोहोचते. नोकरीच्या निमित्ताने कार्यालयातील सहकारी तसेच कार्यालयाशी संबंधित व्यक्ती यांच्याशी सातत्याने संपर्क येत असल्याने काही वेळा पती किंवा पत्नीचे विवाहबाह्य संबंध निर्माण होतात ज्यामुळे जोडीदारांत वाद होऊन नात्यात भेग निर्माण होते. काहीवेळा विवाहाआधी घडलेले प्रसंग, आजार किंवा जीवनातील एखादी गंभीर घटना याविषयी समोरच्यांशी मोकळेपणाने बोलले जात नाही. या गोष्टी विवाहानंतर लक्षात आल्यावर विश्वासघाताची भावना मनात निर्माण होऊन नात्यातील जवळीकता लोप पावू लागते. ज्याचे पर्यावसान पुढे वादांत आणि भांडणांत होऊन प्रकरण न्यायालयापर्यंत जाते. आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाहांना सरकाकडून प्रोत्साहन आणि संरक्षण दिले जात असले, तरी विवाहानंतर अचानक बदललेले राहणीमान, तेथील चालीरीती, खाण्या पिण्याच्या सवयी यांचा स्वीकार करताना संघर्ष होतो. आंतरधर्मीय विवाह करताना काहीवेळा जोडीदारावर धर्मपरिवर्तन करण्यास सक्ती केली जाते. असे विवाहही फार काळ टिकत नाहीत. याखेरीज पती पत्नींची मानसिक स्थिती, त्यांच्या सवयी, वागण्या बोलण्याच्या पद्धती, परस्परांच्या नातेवाईकांशी असलेली वर्तणूक यासुद्धा काही प्रम ाणात घटस्फोटास कारणीभूत ठरू लागल्या आहेत. जोडीदाराला असलेली व्यसने त्याचा मित्रवर्ग यागोष्टीही लग्नाआधी ज्ञात नसल्यास गंभीर वादास कारणीभूत ठरतात.

पतिपत्नीचे नाते बहरण्यासाठी एकमेकांना समजून घेणे, एकमेकांना गुणदोषांसह स्वीकारणे, परस्परांशी मनमोकळेपणाने बोलणे, एकमेकांना प्रोत्साहन देणे, आवश्यक तिथे तडजोड करणे, माघार घेणे, परस्परांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण करणे या गोष्टी प्राथमिक टप्प्यावर अत्यंत आवश्यक असतात. आपला अहंकार जपत राहिल्यास लहान सहान प्रकरणात विनाकारण मनात क्लेश निर्माण होऊन नात्यातील प्रेम लोप पावू लागते. आताच्या पिढीवर अनैतिकता पसरवणारे चित्रपट, कुटुंबव्यवस्थेला छेद देणाऱ्या मालिका, वासनांधतेने भरलेल्या वेब सिरीज यांचा प्रभाव अधिक आहे. विवाहसंस्था आणि कुटुंबव्यवस्था यांना तुच्छ लेखनाऱ्या या चित्रपट-मालिकांमध्ये विवाहबाह्य संबंध, गृहकलह, घटस्फोट यांसारखे विषय चवीने चघळले जातात. लिव्ह इन रिलेशिनशिपसारख्या पाश्चिमात्य विकृतीला देशात कायद्याचे संरक्षण असल्याने घटस्फोट घेणे किंवा एक जोडीदार असताना दुसऱ्यासोबत राहणे आजच्या आधुनिक म्हणवणाऱ्या पिढीला तितकेसे चुकीचेही वाटत नाही. भारतीय कुटुंब व्यवस्था टिकवायची असेल, तर या व्यवस्थेचे लाभ महाविद्यालयीन शिक्षणातून शिकवले जायला हवेत त्यासोबतच चित्रपट, मालिका, वेब सीरिज यांतुन भारतीय संस्कृतीला छेद देणारे प्रसंग, कथानक, संवाद यांवर निर्बंध आणणे आज आवश्यक बनू लागले आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## गडावर..

गोपीनाथ गडावर
वाटते किमयागार
निसर्गाचे सानिध्य
वारा वाहे थंड गार

भव्य दिव्य कमान
आगंतुका सत्कार
जात धर्म विसरतो
घडे कैक चमत्कार

इकोफ्रेंडली परिसर
पाय चाले सर सर
पक्षी करे गुंजारव
दुःखां नसे अवसर

जीवंत भासे पुतळा
डोळ्यां फुटे पाझर
जीवन चरित्र तुमचे
आठवात झर झर

कमळाचीकलाकृती
सजली ती धरोवर
निरामय स्वभावाचे
स्मरण येई खरोखर

समाधी दर्शन घेता
कळे कर्तृत्व स्थावर
किर्तीसांगे इतिहास
सूर्यदिवाकर जोवर

भासे आपला वावर
हुंदका होई अनावर
निघताना जडावलो
यावे वाटेल वरचेवर

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध अचूक बातमी

# ताल बार अँड रेस्टॉरंटवर धाड ! २३ जणांवर गुन्हा दाखल

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०३, कल्याण :** महात्मा फुले पोलीस ठाणे हद्दीतील ताल बार अँड रेस्टॉरंटवर, पोलीस उपायुक्त परिमंडळ ३ कल्याण यांच्या आदेशाने, गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या सहाय्याने रात्री उशिरा कारवाई करण्यात आली. ही कारवाई मध्यरात्री १:४० वाजेच्या सुमारास करण्यात आली.

पोलिसांनी तपासणी केली असता संबंधित बार विहित वेळेपेक्षा जास्त वेळ सुरु असल्याचे आढळून आले. तसेच, तेथे उपस्थित ६ महिला सिंगर या तोडक्या कपड्यांत अश्लील हावभाव करत डान्स करत असल्याचे निदर्शनास आले. तत्काळ पंचांच्या उपस्थितीत 'ई-साक्ष' ॲपद्वारे पंचनामा करण्यात आला.




या प्रकरणी एकूण १७ पुरुष व ६ महिला सिंगर अशा एकूण २३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, महात्मा फुले पोलीस ठाण्यात गु. रजि. क्र. ६३६/२०२५ भारतीय दंड संहितेच्या कलम २९६, ५४, ३(५) अंतर्गत नोंद करण्यात आली आहे. कारवाई दरम्यान एकूण रु. २८,९८० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नागरिकांसाठी आवाहन...**

आपल्या परिसरात गल्लीबोळात, रस्त्यालगत कोणतेही बार, रेस्टॉरंट, हॉटेल किंवा वाईन शॉप असेल आणि त्यांचा त्रास होत असेल – उदा. उशिरापर्यंत चालू ठेवणे, रस्त्यावर बेकायदेशीर पार्किंगमुळे ट्रॅफिक अडथळा, अश्लील वर्तन, महिलांचा तोकड्या कपड्यांत वावर इत्यादी – तर आपण कल्याण पश्चिम परिमंडळ ०३ च्या अधिकाऱ्यांना भेटून तक्रार नोंदवू शकता.

आपली तक्रार गोपनीय ठेवली जाईल. अशा प्रकारच्या अनैतिक व अवैध कृत्यांचा आपल्या समाजावर विपरीत परिणाम होतो, त्यामुळे अशा प्रकारांवर वेळेत कारवाई होणे आवश्यक आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## महिलांसाठी मोफत हेअर कलर

## डोंबिवलीतील बॅनरची सर्वत्र जोरदार चर्चा




**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०३, डोंबिवली (ठाणे) :** राजकीय मंडळींकडून वेगवेगळ्या कार्यक्रमाचे, विकास कामांचे बॅनर झळकलेले आपण अनेक वेळा पाहिले असतील. मात्र डोंबिवलीतील एका अनोख्या उपक्रमाचा बॅनर सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे. नुकताच पुरुष आणि स्त्रियांना मोफत हेअर कलर करुन देण्याचा कार्यक्रम डोंबिवलीत पार पडला. त्याच्याच बॅनरची जोरदार चर्चा होत आहे. निवडणुकीच्या तोंडावर करण्यात आलेली ही अनोखी स्टंटबाजी असल्याची चर्चा सुरू आहे.

दरम्यान राजकीय मंडळींकडून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम, योजना आणि प्रलोभनात्मक कार्यक्रम राबवले जातात. डोंबिवलीत लागलेल्या या अनोख्या आणि विचित्र वाटणाऱ्या बॅनरची सोशल मीडियावर जोरदार चर्चा आणि टीकेची लाट उसळली आहे. डोंबिवलीत 'मोफत हेअर कलर शिबिरा'चे आयोजन करण्यात आलं. या कार्यक्रमाचं उद्घाटन एका मराठी सिनेअभिनेत्रीच्या हस्ते करण्यात आले. शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक जनार्धन म्हात्रे, त्यांच्या पत्नी माजी नगरसेविका रेखा जनार्धन म्हात्रे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केलं. या सर्व कार्यक्रमाची माहिती बॅनरच्या माध्यमातून देण्यात आली. दिनांक २३ आणि २४ मे २०२५ रोजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं. मोफत हेअर कलर उपक्रम प्रभागातील महिलांसाठी ठेवण्यात आला होता. या उपक्रमाचा लाभ शेकडो महिलांनी घेतल्याची माहिती आहे.

## कल्याणमध्ये अनेक ठिकाणी रस्त्यामध्ये बस बंद - नागरिकांची गैरसोय, ट्रॅफिक जाम

**अक्षराज : भानुदास गायकवाड**



**दि.०३, कल्याण (ठाणे) :** कल्याण शहरातील अनेक भागांमध्ये केडीएमसीच्या (घृचउ) बस बंद पडल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. बस बंद झाल्यामुळे शहरात अनेक ठिकाणी तीव्र वाहतूक कोंडी पाहायला मिळाली. यामध्ये मेट्रोचे सुरू असलेले काम ही अधिक अडथळा ठरत आहे. ज्यामुळे आधीच वाहतूक विस्कळीत झाली आहे. बस बंद पडल्यामुळे अनेक प्रवासी हैराण झाले आहेत. शाळा, कॉलेज, ऑफिसला जाणाऱ्या प्रवाशांना उशीर झाला असून त्यांची मोठी तारांबळ उडाली. अनेक बस रस्त्यातच बंद पडताना दिसल्या, तर काही बस अत्यंत खराब स्थितीत असूनही रस्त्यावर धावत आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ही उपस्थित झाला आहे. विशेष म्हणजे, केडीएमसीने सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी कोट्यवधींचा निधी खर्च केला जातो. तरीही बस सेवा वेळच्या वेळी बंद पडत आहे. हे पाहता यामागे काही गौडबंगाल आहे का, असा प्रश्न नागरिक विचारू लागले आहेत. अनेक बस खराब स्थितीत असून त्यांचे देखभाल आणि दुरुस्ती काम वेळेवर होत नसल्याचीही तक्रार नागरिकांनी केली आहे. शहरातील वाहतूक पोलिस आणि प्रशासनाने यावर त्वरित लक्ष देणे गरजेचे आहे. बस सेवा सुरळीत नसेल तर पर्यायी वाहतुकीची सोय करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## टाकळीढोकेश्वर ग्रामस्थांतर्फे आसिफ हवालदार यांचा सत्कार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाचा विद्यार्थी आसिफ हवालदार यांनी ग्लँड केमिकल्स, संभाजीनगर या नामांकित औषधनिर्मिती कंपनीमध्ये निवड झाल्याबद्दल निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी व टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने नुकतेच मानाचा फेटा बांधून सत्कार करून शुभेच्छा दिल्या. आपल्या पारनेर तालुक्यातील मुले - मुली वेगवेगळ्या क्षेत्रात विविध पदे पटकावित आहेत. हे पाहून समाधान होते. टाकळी ढोकेश्वर येथील राजू हावलदार यांचे सुपुत्र आसिफ हवालदार यांनी त्यांच्या कौशल्य आणि मेहनतीच्या जोरावर औषधनिर्मिती क्षेत्रात निवड होऊन नोकरीची संधी उपलब्ध झाली असून त्याचा टाकळी ग्रामस्थांना सार्थ अभिमान आहे. त्यांच्यापासून तालुक्यातील मुले - मुलींना निश्चितच प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळणार आहे. ग्रामस्थांतर्फे मी त्यांचें अभिनंदन करून शुभेच्छा देतो, अशी भावना बाळासाहेब खिलारी यांनी व्यक्त केली. याप्रसंगी खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी,शिराज हवलदार, ओबीसी सेलचे उपाध्यक्ष मळिभाऊ रांधवण, अनिल चव्हाण, साजिद पटेल, सुभाष निवडुंगे, नौशाद हावलदार, सोहेल हावलदार उपस्थित होते.

## कुंडलवाडीत छावा संघटनेच्या शाखेची स्थापना



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०२, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी येथे नुकतेच छावा मराठा संघटना महाराष्ट्र अंतर्गत छावा संघटनेच्या नूतन शहर शाखेची स्थापना करण्यात आली तर शहर कार्यकारिणीची निवड करण्यात आली असुन कार्यकारणी फलकाचे अनावरण करण्यात आले. या शहर कार्यकारिणीच्या शहराध्यक्षपदी प्रा.डॉ.माधव हळदेकर तर सचिवपदी दत्ता हमंद, उपाध्यक्षपदी करण समेटवार, कार्याध्यक्षपदी डॉ.नरेश बोधनकर तर,सदस्यपदी विनोद काळेवार, अनिल पेंटावार यांची निवड करण्यात आली आहे. सदरील निवडीची नियुक्तीपत्र छावा मराठा संघटना महाराष्ट्राचे प्रदेश कार्याध्यक्ष इंजि.तानाजी हुस्सेकर, छावाचे संघटक तथा लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कमलाकर कनसे, छावाचे प्रवक्ते डॉ.प्रभाकर जाधव, आंबेडकरवादी चळवळीचे कार्यकर्ते डॉ.सुनीलचंद्र सोनकांबळे, भाजपा व्यापारी आघाडीचे जिल्हाउपाध्यक्ष दिनेश दाचावार, सेवानिवृत्त अभियंता शिवाजीराव हळदेकर यांच्या उपस्थितीत देण्यात आले.याप्रसंगी प्रा.सतीश पवार,डॉ.बालाजी ककटवार, बाबळी येथील उपक्रमशील उपसरपंच धनराज कदम, दौलापुर येथील सरपंच नामदेव पाटील, मराठाभूषण गणपत पाटील, प्रसिद्ध व्यावसायिक रुपेश पाटील चोळाखेकर, पांडुरंग पाटील जगदंबे, उद्योजक आकाश ढगे,तानाजी पाटील माष्टीकर, सूरज जाधव रोषणगावकर, बंटी पाटील आवरे, प्रताप कदम, दिपक कदम, आकाश कदम, कृष्णा कदम इत्यादीची उपस्थिती होती.

## दिवा विभागातील अनधिकृत शाळा संदर्भात उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०३, दिवा (ठाणे) :** दिवा विभागात सध्या अनेक अनधिकृत शाळा सुरू असून, माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांनी थझ क्र १६४३२/२०१८ अंतर्गत दिलेल्या स्पष्ट आदेशांनुसार या शाळा तात्काळ बंद करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, या शाळांतील विद्यार्थ्यांचे समायोजन नजीकच्या मान्यता प्राप्त शाळांमध्ये करण्यात यावे आणि नवीन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये कोणत्याही अनधिकृत शाळेत प्रवेश दिला जाऊ नये, असे आदेश आहेत.






याशिवाय, बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील कलम १८ (५ ) आणि १९(१) नुसार, अनधिकृत शाळा चालवणाऱ्या संस्थाचालक व शाळा व्यवस्थापनावर १,००,०००रुपये दंड, तसेच शाळा बंद न केल्यास पुढील प्रत्येक दिवशी १०,००० रुपये दंड आकारण्याची तरतूद आहे.

महत्त्वाचे म्हणजे, महापालिकेकडून संबंधित संस्थाचालकांना आधीच नोटिसा बजावण्यात आल्या असूनही अद्याप अनधिकृत शाळा बंद झालेल्या नाहीत, आणि त्यामुळे माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशांचा स्पष्ट अवमान केला जात आहे. यामुळे शेकडो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित धोक्यात आले असून, पालक वर्गामध्ये मोठी अस्वस्थता आहे.

तरी प्रशासनाकडे मागणी करण्यात येत आहेकी:अनधिकृत शाळा तात्काळ बंद कराव्यात. विद्यार्थ्यांचे योग्य समायोजन तत्काळ सुनिश्चित करावे.दोषी संस्थाचालक व व्यवस्थापनांवर कायद्याप्रमाणे कडक दंडात्मक कारवाई करावी. जर प्रशासनाकडून त्वरीत कार्यवाही झाली नाही, तर न्यायालयीन अवमान प्रक्रिया सुरू करण्याचा इशा करण्यात येईल. असे कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे यांनी म्हटले.

## गुन्हेगारी मोडून काढणार : पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे

### गावठी कट्टे,चेन स्नेचिंग, कत्तलखाने, घुसखोर एसपींच्या रडारवर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, अहिल्यानगर :** जिल्ह्यात सध्या गुन्हेगारीचे स्वरूप बदलले आहे. पोलिसांनी आता अधिक दक्ष राहण्याची गरज आहे. कोणत्याही प्रकारची दबंगगिरी न करता गुन्हेगारांवर वचक निर्माण करून कायदा-सुव्यवस्थेचा प्रभावी अंमलबजावणी केली जाईल, अशी स्पष्ट भूमिका जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी मांडली.



सोमवारी (२ जून) पोलीस अधीक्षक कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे व वैभव कलबुर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक दिनेश आहेर, तोफखाना पोलीस ठाण्याचे निरीक्षक आनंद कोकरे उपस्थित होते.

पोलीस अधीक्षक घार्गे यांनी स्पष्ट केले की, सराईत गुन्हेगारांविरूध्द कडक कारवाई करण्यासाठी एमपीडीए आणि तडीपारीची अंमलबजावणी प्रभावीपणे केली जाईल. सोनसाखळी चोरीच्या घटना रोखण्यासाठी महत्त्वाच्या ठिकाणी गस्त वाढवली जाईल. गावठी शस्त्रांचा शोध, महिलाविषयक गुन्ह्यांचे अन्वेषण, आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर सतत लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**आर्थिक फसवणुकीचा जलदगतीने तपास**

आर्थिक गैरव्यवहारामुळे फसवणुकीचे प्रमाण वाढले आहेत. यात पतसंस्थांमधील आर्थिक गैरव्यवहारामुळे गुंतवणूकदारांना होणाऱ्या नुकसानीला आळा घालण्यासाठी व जलदगतीने तपास करण्यासाठी संबंधित विभागाला आवश्यक व त्याच्याशी निगडीत असलेल्या अभ्यासू कर्मचाऱ्यांची वाढीव नियुक्ती करण्यात आली आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचा ठाम अंमल करून जिल्ह्यातील नागरिकांना सुरक्षितता आणि शांततेचा विश्वास देण्याच्या दृष्टीने काम केले जाईल असे अधीक्षक घार्गे यांनी सांगितले.

गोवंश हत्या कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही, अशा कठोर शब्दांत अधीक्षक घार्गे यांनी आपली भूमिका मांडली. संबंधित अधिकार्यांना याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. जातीय तणाव निर्माण होणार नाही, याची काळजी घेण्याचे निर्देशही पोलीस दलाला देण्यात आले आहेत. अहिल्यानगर शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू असून, दोन दिवसांपूर्वी झालेल्या बदल्यांमध्ये वाहतूक शाखेतील मनुष्यबळ वाढवण्यात आले आहे.

## महावितरण एजन्सीचे बसवण्यात येणाऱ्या स्मार्ट/प्रीपेड मीटरला बाबाजी चासकरचा विरोध

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, महाळुंगे पडवळ :** महावितरण कंपनीने राज्यातील सर्व वीज ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटर्स लावणार असे जाहीर केले आहे. हे मीटर्स कंपनीच्या स्व - खर्चाने मोफत लावणार अशी फसवी व चुकीची जाहिरात केली आहे.या संबंधातील टेंडर्स मंजूर करण्यात आलेली आहेत व लवकरच सर्वत्र मीटर्स लावण्याची मोहीम सुरू होईल असे स्पष्ट दिसून येत आहे. वास्तविक हे मीटर्स मोफत लावले जाणार नाहीत. केंद्र सरकारचे अनुदान वगळता या मीटर्सचा उर्वरित सर्व खर्च वीजदरनिश्चिती याचिकेद्वारे आयोगाकडे मागणी केला जाईल आणि आयोगाच्या आदेशानुसार वीजदरवाढीच्या रुपाने १ एप्रिल २०२५ पासून ग्राहकांच्या खिशातूनच वसूल केला जाईल हे निश्चित व स्पष्ट आहे.त्यामुळे केवळ महावितरण कंपनी वा येणाऱ्या खाजगी वितरण कंपन्या वा सरकार यांच्या हितासाठी आणि खाजगीकरणाच्या वाटचालीतील पुढचा टप्पा म्हणनूच ही योजना आणलेली आहे असे स्पष्ट दिसनू येत आहे. त्यामुळे आम्ही या स्मार्ट/प्रीपेड मीटर्सना संपूर्ण विरोध करीत आहोत व खालील प्रमाणे मागण्या करीत आहोत.

वीज कायदा २००३ मधील अधिनियम क्रमांक ४७ (५) अन्वये कोणता मीटर वापरायचा याचे स्वातंत्र्य व मीटरची निवड करण्याचे सर्व कायदेशीर हक्क संबंधित ग्राहकांना आहेत.कंपनी अघोषित सक्ती करून ग्राहकांच्या या हक्काचे व कायदेशीर तरतुदींचे संपूर्ण उल्लंघन करीत आहे, हे आम्हाला मान्य नाही.त्यामुळे ग्राहक म्हणून आमच्या हक्कानुसार आमचा सध्याचा आहे तोच पोस्टपेड मीटर पुढेही कायम ठेवण्यात यावा अशी मागणी आम्ही करीत आहोत.



महावितरण कंपनीने मंजूर केलेल्या टेंडर्सनुसार मीटर्सचा खर्च १२०००/- रु.प्रति मीटर याप्रमाणे आहे.प्रीपेड मीटरसाठी केंद्र सरकारचे प्रति मीटर ९००/- रु.अनुदान वगळता प्रत्येक ग्राहकामागे कमीत कमी ११९००/- रु.प्रति मीटर खर्च कर्ज काढून केला जाणार आहे.या कर्जास आमची मान्यता नाही व आम्ही हा मीटर घेणार नाही. त्यामुळे हा खर्च आमच्यावर लादता येणार नाही. या खर्चामुळे या कर्जावरील व्याज,घसारा व संबंधित खर्च इ. कारणासाठी वीज दरामध्ये वाढ होणार आहे.ही वाढ अंदाजे किमान ३० पैसे प्रति युनिट व अधिक होईल. आम्ही हा मीटर वापरणार नसल्यामुळे या वाढीव दराचा कोणताही बोजा आमच्यावर लावता येणार नाही याची नोंद घ्यावी.

कृपया आमच्या वरील मागण्यांची नोंद घ्यावी आणि याबाबत पुढील कार्यवाही तातडीने करावी ही विनंती. सक्तीने असे मीटर लावण्याचा प्रयत्न केल्यास आम्ही अशा सक्तीच्या जोडणीला प्रखर विरोध व आंदोलन करू याची कृपया नोंद घ्यावी, असा इशारा हुतात्मा बाबू गेनू युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाबाजी चासकर यांनी दिला.

## बाणकोट सागरी पोलीस ठाण्यात सामाजिक सलोखा समिती स्थापन

**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.०३, दापोली (रत्नागिरी) :** बाणकोट सागरी पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील सामाजिक सलोखा समिती सदस्यांची पोलीस ठाणे येथे बैठक घेऊन सामाजिक सलोखा समिती ही संकल्पना माननीय पोलीस अधीक्षक रत्नागिरी यांची असून सदर समिती स्थापना करण्याचा उद्देश बाणकोट पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चव्हाण यांनी सर्व सदस्यांना समजावून सांगून उपस्थितांना सामाजिक सलोखा राखण्यासंदर्भात विविध सूचना करण्यात आल्या.

यावेळी पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात सामाजिक शांतता राहावी याकरता सर्व धर्मीय प्रतिष्ठित व्यक्ती तसेच प्रत्येक क्षेत्रातील मान्यवर यांचा या कमिटीमध्ये समावेश करण्यात आला. या कमिटीच्या माध्यमातून पोलीस ठाणे स्तरावर महत्त्वाच्या सणांच्या पार्श्वभूमीवर मीटिंग घेऊन कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही. याकरता प्रयत्न करण्यात



येणार असून कमिटी सदस्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगण्यात आले.

सामाजिक सलोखा समिती सर्व समावेशक असून या समितीच्या वतीने सर्व धर्मीय सण आनंदात साजरे होण्याकरिता प्रयत्न करण्यात येणार आहे असल्याबाबत नमूद केले आहे आगामी बकरी ईद सणाच्या अनुषंगाने गोवंश हत्या तसेच गोमास वाहतूक इत्यादी वरून कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याकरिता स्थानिक पातळीवर बैठक घेऊन प्रयत्न करणे बाबत सांगण्यात आले. सायबर क्राईम बाबत सतर्क राहणे ऑनलाईन नवनवीन येणारे किंवा आर कोड बाबत सूचना दिल्या शहर व गावात अमली पदार्थ विरोधी मोहीम अंतर्गत नशा पान करणारे बाळगणारे व विक्री करणाऱ्यांना अशा घटकावर लक्ष ठेवणे सर्व धार्मिक सण उत्सवाचे कोणत्याही समस्या असल्यास त्याबाबत पोलिसांना माहिती देण्याचे सांगण्यात आले. सदर सामाजिक सलोखा समिती ३० सदस्याचे नेमण्यात आली. या सभेसाठी मंडणगड तालुका काँग्रेसचे अध्यक्ष मुस्ताक भाई मिरकर , वेसवी गावचे उपसरपंच व शिवसेना विभाग प्रमुख आनंद भाटे, बाणकोट सरपंच नूरला परकार, इस्माईल उंदरे, वाल्मिकी नगर गावचे उपसरपंच विश्वजीत पाटील, अमोल सोमन, मोहन उपाध्ये, निलेश मोरे, रविंद्र वनगुले, अनंत जगताप व पत्रकार उमेश तबीब व इतर मान्यवर ग्रामस्थ, सदस्य बैठकीला उपस्थित होते.

# पनवेल महापालिकेच्या वतीने बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवरती नियोजन बैठक संपन्न

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०३, पनवेल :** बकरी ईद सणानिमित्त कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, तसेच सण शांततेत संपन्न होण्याकरिता नियोजन करण्याच्या हेतूने आज महापालिकेच्या मुख्यालयात आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली पालिका मुख्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले.

या बैठकीस पोलिस उपायुक्त अशोक राजपुत, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. भगवान गीते, डॉ. मधुलिका लाड, पनवेल शहर वरिष्ठ पोलिस निरीक्षक नितीन ठाकरे, तळोजाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रवीण भगत, वरिष्ठ पोलिस निरीक्षक खारघर दिपक सुर्वे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक खांदेश्वर स्मिता ढाकणे, चारही प्रभागाचे प्रभारी अधिक्षक, चारही प्रभागातील मुस्लिम समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.दिनांक ०७ जून २०२५ रोजी पनवेल महानगरपालिका क्षेत्रात बकरी ईद सण साजरा करण्यात येणार आहे.

सदर सणानिमित्त मुस्लीम बांधवाकडून कुर्बानी देण्याची प्रथा आहे. कुर्बानी देणे कामी तात्पुरते कत्तलखाने उभारण्याकरिता परवानगी घेणे आवश्यक असते. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात बकरी ईद करीता कुर्बानी साठी काही अटी व शर्तीस अधिन राहुन तात्पुरता कत्तलखाना उभारण्यास परवानगी देण्यात येते. यासाठी प्रभाग समिती निहाय,



प्रभाग अधिकारी यांना सदर परवानगी देणेकामी प्राधिकृत करण्यात आले आहे. संबंधितांनी परवानगीसाठी अर्ज करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. चारही प्रभागांमध्ये ज्या ठिकाणांना परवानगी देण्यात आली आहे.

त्याठिकाणीच बकऱ्यांची कत्तल केली जावी, ही ठिकाणे बंदिस्त असावीत, विविध सूचना या बैठकीत देण्यात आल्या. तसेच महापालिकेकडून पाण्याची सोय व स्वच्छता विभागाने वाहनांची सोय करण्याबाबत मुस्लिम समाजाच्या प्रतिनिधींनी मागणी केली. आयुक्तांनी या मागण्या मान्य करून हा सण शांततेत, उत्साहात संपन्न होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन पालिका व पोलिस विभागाच्यावतीने करण्यात आले. तर परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# रामाळा तलावाच्या संरक्षण भिंतीच्या कामाची आ.जोरगेवार यांच्याकडून पाहणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, चंद्रपूर :** चंद्रपूरच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक ओळखीचा अविभाज्य भाग असलेल्या रामाळा तलावाच्या संरक्षणासाठी ३० कोटी रुपयांच्या निधीतून सुरु असलेल्या संरक्षण भिंत बांधकामाची आमदार किशोर जोरगेवार यांनी नुकतीच पाहणी केली. या पाहणी दरम्यान संबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. या कामामुळे तलावाचे जतन, सौंदर्यीकरण आणि परिसरातील सार्वजनिक सुरक्षिततेची खात्री होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी चंद्रपूर महानगरपालिकेचे अभियंता शिडाम यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे महानगर जिल्हाध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, माजी नगरसेवक देवानंद वाढई, प्रदीप किरमे, प्रशांत चौधरी, शिवसेना शहरप्रमुख बंडू हजारे, रामाळा तलाव बचाव संवर्धन संघर्ष समितीचे जुगल सोमानी, सुधीर बजाज, विनोद सोन, राशिद हुसेन, नकुल वासमवार, संजय बोरघाटे, कार्तिक



बोरेवार, आदी उपस्थित होते. रामाळा तलाव हा शहराच्या मध्यवर्ती भागात असून, शतकानुशतकं पासून नागरिकांच्या जीवनशैलीशी निगडित आहे. तलावाच्या नैसर्गिक आणि ऐतिहासिक महत्त्वामुळे त्याचे जतन करणे ही काळाची गरज आहे. या अनुषंगाने शासनाच्या ३० कोटी रुपयांच्या निधीतून संरक्षण भिंतीचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामाची आ. किशोर जोरगेवार यांनी पाहणी केली. पाहणीदरम्यान अधिकाऱ्यांना कामाच्या दर्जावर भर देण्याच्या सूचना देण्यात आल्या. हे काम दर्जेदार, मजबूत आणि वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. नागरिकांच्या भावना या तलावाशी जोडलेल्या आहेत. त्यामुळे या कामात कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी दक्षता घ्यावी, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

भिंतीच्या बांधकामामुळे तलावाच्या किनाऱ्यांचे संरक्षण होईल आणि तलावात गाळ जाण्याचे प्रमाण कमी होईल. परिणामी, तलावाचे पाणी शुद्ध राहील आणि परिसरातील जैवविविधतेलाही चालना मिळणार आहे. तलावाच्या संरक्षणाच्या या प्रकल्पामुळे केवळ चंद्रपूरच्या ऐतिहासिक ओळखीचेच नव्हे, तर जैवविविधता आणि पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी मोठी मदत होईल. रामाळा तलाव हे चंद्रपूरचे भूषण आहे. या तलावाचे जतन करण्यासाठी निधी मंजूर झालेला आहे. काम वेळेत पूर्ण व्हावे, यासाठी अधिकारी आणि अभियंते सातत्याने प्रयत्नशील आहेत. नागरिकांची अपेक्षा आणि तलावाचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असेही यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी सांगितले.

# अंगणवाडी सेविकांना मिळणार शिक्षिकांचा दर्जा; चिमुकल्यांना देणार ज्ञानाचे धडे

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०३, मुंबई :** राज्य सरकारच्या शालेय शिक्षण विभागामार्फत २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू होणार आहे. राज्यातील अंगणवाडी सेविकांना आता शिक्षकांचा दर्जा मिळणार असून या अंगणवाडी सेविका आता चिमुकल्यांना ज्ञानाचे धडे देणार आहेत. या अंतर्गत अंगणवाडी आणि इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्णतः बदलण्यात येणार आहे. त्यानुसार प्राथमिक शाळांतील पहिलीच्या शिक्षकांना तसेच अंगणवाडी सेविकांना विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

**सेविकांना शिक्षिकेचे प्रशिक्षण -**

राज्यातील ५५३ एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत तब्बल १ लाख १० हजार ५५६ अंगणवाड्या कार्यरत आहेत. त्यामध्ये सव्वा लाखांपेक्षा अधिक अंगणवाडी सेविका कार्यरत आहेत. यापैकी इयत्ता बारावी उत्तीर्ण सेविकांना प्राथमिक टप्प्यात ६ महिन्यांचे आणि दहावी उत्तीर्ण सेविकांना एक वर्षाचे बालशिक्षण प्रशिक्षण दिले जाणार आहे. दरम्यान या



प्रशिक्षणाद्वारे सेविकांना ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना कसे शिकवायचे, त्यांच्या भावनिक, सामाजिक आणि बौद्धिक विकासासाठी कोणत्या उपक्रमांचा वापर करायचा, याचे मार्गदर्शन दिले जाणार आहे. विशेष म्हणजे, पालकांनाही या प्रक्रियेत सामावून घेतले जाणार आहे, जेणेकरून घर आणि अंगणवाडीत एकसंध विकास वातावरण निर्माण होईल.

**खेळत खेळत शिक्षण, शिकवण्याची नवी पद्धत -**

नवीन धोरणात 'मनोरंजनातून शिक्षण म्हणजेच खेळत खेळत शिक्षण' या तत्त्वाला अधिक प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे, चिमुकल्यांना शाळेची गोडी लागावी आणि ती कायम राहावी, यावर भर दिला जात आहे. अक्षर, अंक, रंग, आकार ओळख, शब्दांचे उच्चार, मुळाक्षरे हे शिक्षण आता सेविका अधिक प्रभावी आणि सर्जनशील पद्धतीने देतील.

**प्रशिक्षणासाठी कार्यशाळांचा आधार -**

सर्व अंगणवाडी सेविकांना एकाच पातळीवर आणण्यासाठी, त्यांना बालशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकवण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमासाठी 'डायट' (जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था) मार्फत एकूण ८ कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असून आतापर्यंत २ कार्यशाळा पार पडल्या आहेत.

यामध्ये बारावी उत्तीर्ण सेविकांना ६ महिने ऑनलाईन प्रशिक्षण दिले जाईल तर दहावी उत्तीर्ण सेविकांसाठी हा कालावधी एक वर्षाचा असणार आहे. या अभ्यासक्रमात शिक्षणाचे तंत्र, अध्यापन कौशल्ये, खेळावर आधारित शिकवण्याच्या पद्धती इत्यादी विषयांचा प्रामुख्याने समावेश असणार आहे.

# महावितरण तर्फे गुरुवारी लासलगाव उपविभाग येथे निबंध, चित्रकला स्पर्धेचे आयोजन

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०३, विंचूर (नाशिक) :** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या विसाव्या वर्धापन दिनानिमित्त राज्यभरात दिनांक ०१ ते ०६ जून २०२५ दरम्यान विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. याच कार्यक्रमाचा भाग म्हणून लासलगाव उपविभागा अंतर्गत लासलगाव उपविभाग महावितरण व कर्मवीर भाऊराव पाटील शाळा व कनिष्ठ महाविद्यालय विंचूर यांचे संयुक्त विद्यमाने गुरुवारी दिनांक ०५ जून २०२५ रोजी सकाळी १० ते ११ वाजता निफाड तालुक्यातील शालेय विद्यार्थी व महावितरण कर्मचारी पाल्यांसाठी 'विद्युत सुरक्षितता' या विषयावर चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

आम्ही सुरक्षेचे शिल्पकार, शून्य विद्युत अपघाताने करू महावितरणचे ध्येय साकार हे या स्पर्धेचे ब्रीद आहे. सदर स्पर्धा कर्मवीर भाऊराव पाटील शाळा व कनिष्ठ महाविद्यालय विंचूर तालुका निफाड, येथे होणार असून स्पर्धेसाठी कोणतेही शुल्क नाही. स्पर्धेत प्रथम तीन क्रमांक प्राप्त करणाऱ्या स्पर्धकांना विविध बक्षीसे व सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र यांचे वाटप करण्यात येणार आहे.

निफाड तालुक्यातील पहिली ते दहावी इयत्तेतील जास्त जास्त विद्यार्थ्यांनी सदर स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन कार्यकारी अभियंता केशव काळुमाळी व प्रभारी उपकार्यकारी अभियंता किरण काकड यांनी केले आहे. सदर स्पर्धेसाठी आयोजकांकडून ड्रॉइंग पेपर व अखीव पेपर पुरविण्यात येईल.

# 'गणराज' इस्पात कंपनीच्या धुरांमुळे-जनजीवन विस्कळीत; प्रदुषणात वाढ

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०३ सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील सुपा हे नगर पुणे हायवे रोडवर वसले असुन त्या ठिकाणी ४०ते ४५ गावांचा दळणवळणाचा दरडोई संबंध येत असून सुपा पंचक्रोशीतील सुपा औद्योगिक वसाहत ही मोठ्या प्रमाणात वसली असुन नवीन औद्योगिक वसाहत ही नगर पुणे हायवे लगत आसल्याने त्या ठिकाणी गणराज इस्पात कंपनी वसली आहे. त्या कंपनीच्या धुरांमुळे तेथील परिसरातील गावाचे जनजीवन अंधारमय झाले आहे .सदर कंपनीच्या धुरामुळे परिसरातील वातावरण अंधारमय झालेले दिसते. त्यामुळे प्रदुषनात वाढ झालेली दिसते. ही वस्तुस्थिती आज पहावयास मिळते. अनेक वेळा कंपनीला लेखी निवेदन देउन ही काहीही कार्यवाही झालेली दिसुन येत नाही. विशेष म्हणजे गणराज इस्पात कंपनी ही नगर पुणे हायवे रोड लगत असल्याने सदर कंपनीच्या धुरामुळे वाहन चालकांना वाहने चालवताना हायवे रोड दिसत नाही. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढलेले दिसते. राजकीय मंडळींना अनेक वेळा लेखी निवेदन देऊन ही कंपनीवर कोणतीच कार्यवाही झालेली दिसत नाही. राजकीय मंडळीनी तोंडावर बोट ठेवल्याचे चित्र दिसत आहे. कंपनीच्या धुरामुळे प्रदुषणात वाढ होउन परिसरातील जनजीवन विस्कळीत झाल्याचे चित्र दिसत आहे. धुरांमुळे अनेक रोगांना आमंत्रण दिल्यासारखे दिसते. सदर कंपनीवर कार्यवाही होण्यासाठी ढझड इंटरनॅशनल प्रेसचे पारनेर तालुका अध्यक्ष राजेंद्र चितळकर व पारनेर तालुका माहीती सेवा समीतीचे उपाध्यक्ष, पत्रकार राजकुमार इकडे यांनी जिल्हाचे पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांना निवेदन देणार आहे असे सांगितले.

# थोडक्यात

## बंधाऱ्याचे गेट गायब झाल्याने पाणी अडवणे झाले कठीण

### धाराशिव जिल्ह्यातील बंधारे बनले प्राचीन अवशेष

**अक्षराज : विश्वास वराळे**



**दि.०३, धाराशिव :** धाराशिव जिल्ह्यातील नदी नाले, ओढे यांच्यातील पावसानंतरचे वाहून जाणारे पाणी अडवून ते सिंचनासाठी शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याची कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्याची योजना ही शेतीसाठी हरित क्रांती ठरली होती. मात्र, या योजनेत बंधाऱ्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध होत नसल्याने जिल्ह्यातील नदी नाल्यावरील बंधारे हे प्राचीन अवशेष होऊन बसले आहेत. बंधाऱ्याच्या मूळ उद्देश साध्य होत नसल्याने डागडुजीची गरज असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी साठवण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील बहुतांश बंधाऱ्यांची स्थिती नदीपात्रात उभारण्यात आलेल्या प्राचीन अवशेषासारखी झाली आहे. कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांचे गेट गायब असल्याने बंधाऱ्यात पाणी अडणे कठीण होऊन बसले आहे. गेल्या एक तपापासून बंधाऱ्यांच्या माध्यमातून पाणी आडवा, पाणी जिरवा हा सिंचनाचा उद्देश पाण्यात वाहून गेला आहे. गायब असलेले दरवाजे, दुरुस्तीसाठी निधीची चणचण, लाभार्थीसह ग्रामपंचायतींची ही उदासिनता या कारणामुळे बंधाऱ्यांतील पाणी न अडता वाहून जात असल्याने जानेवारी फेब्रुवारी मध्येच बंधारे कोरडे पडत आहेत. गेल्या ३० ते ३५ वर्षांपूर्वी जिल्ह्यातील विविध नद्या, ओढे, नाल्यांवर मोठ्या प्रमाणात कोल्हापुरी पद्धतीचे बंधाऱ्याचे जाळे उभारण्यात आले आहेत. जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाकडे बहुतांश बंधाऱ्याची देखभाल दुरुस्ती देण्यात आली आहे. दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात पावसाळ्याच्या शेवटी बंधाऱ्यांचे गेट बसविणे आणि पावसाळा सुरू होण्यापूर्वी साधारण जुन महिन्यात गेट काढण्याची पद्धत आहे. दरवर्षी बंधाऱ्यांना दरवाजे बसविणे व ते काढण्याची जबाबदारी लाभार्थी शेतकऱ्यांनी सुरवातीचे काही वर्षे ही कामे केली. परंतु, बहुतांश बंधाऱ्याची गेट अस्ताव्यस्त पडली तर काही गेट जागेवरच कुजून गेली आहेत. जिल्ह्यातील बंधाऱ्यालगत काढून ठेवलेले हजारो गेटही गायब होत गेले.

## जिवनात सकारात्मक विचार आत्मसात करणे गरजेचे - डॉ.केळवदे

### मानसिक आरोग्य जागरूकता चर्चासत्र संपन्न



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०३, नागपूर :** जिवनात निगेटिव्ह विचार आत्मसात केल्यास तणाव वाढतो, उलट पॉझिटिव्ह विचार आत्मसात केल्यास ताणतणाव कमी होतो असे प्रतिपादन डॉ.ओंकार केळवदे यांनी केले ते मानसिक आरोग्य जागरूकता चर्चासत्र कार्यक्रमात बोलत होते. चर्चासत्र कार्यक्रम प्रकाशनगर वसाहत मनोरंजन गृह दोन येथे आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी माजी सभापती चंद्रशेखर पानतावणे, मंगला अतकरी, राजू गावंडे, आर. के. केसकर, महेश वानखेडे, दीपा वानखेडे यांच्यासह महेश नागदवने, डॉ. समीर अन्सारी, रीमा केळवदे, अथर्व केळवदे, द्विपर्णा केळवदे, अमित डोंगरे, रितेश डोंगरे आदि उपस्थित होते.

यावेळी डॉ.केळवदे यांनी मनाचे प्रशिक्षण व आंतरिक शांतीची गुरुकिल्ली या विषयावर चर्चा करतांना उद्देश व्यक्ती आणि विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. शिवाय दैनंदिन जीवनातील ताणतणावांना तोंड देण्याचे प्रभावी मार्ग, तज्ञांनी केलेले मार्गदर्शन, शारीरिक आणि मानसिक परिणाम, मानसिकदृष्ट्या यश आणि शांतीची कल्पना करणे, दैनंदिन जिवनात एकाग्रता वाढविण्यासाठी मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विविध वयोगटातील विद्यार्थ्यांनी भाग घेतला.९ चर्चासत्रात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले.

## तुला बापलेकांचा..; पिता पुत्रांचा एक अनोखा वाढदिवस

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**



**दि.०२, नवी मुंबई :** नवी मुंबई मध्ये कोणत्याही कार्यक्रमात रांगोळी पाहिली की नाव येते शीहरींचे अर्थात हरिविजय उर्फ श्रीहरी पवळे यांचे एखाद्या क्षेत्रावर इतका खोलवर ठसा रुजवणारे व्यक्तिमत्व इतर क्षेत्रात ही काही कमी नाही हे विशेष. कलाशिक्षक, नाट्य लेखक, कलाकार, दिग्दर्शक अशा विविध भूमिकेत शीहरी पवळे सर्वांनाच ज्ञात आहेत. दिनांक ०१ जून २०२५ रोजी श्रीहरी पवळे यांचा आणि बाबांचा वाढदिवस. कला क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांचा कृतज्ञता सन्मान प्रभातच्या माध्यमातून करण्याचे नियोजित होते. परंतु हा सन्मान स्वीकारण्यासाठी त्यांनी एक अट घातली. ती म्हणजे माझी तुला करण्यापूर्वी माझ्या वडिलांचीही तुला झाली पाहिजे. ही अट ऐकून. आम्हाला अतिशय आनंद झाला. कारण आपल्या पित्यांवर कसे प्रेम असावे हे शीहरी पवळे यांच्या या अटीमुळे आम्हाला उमगले. योगायोग म्हणजे त्यांचे वडील यांचा वाढदिवस ही १ जूनच हा दुध शर्करा योग ओळखून श्रीहरी पवळे यांची कला साहित्याने तुला करून त्यांच्या कार्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

यामध्ये चित्रकलेसाठीचे वॉटर कलर, ब्रश संच, वह्या व रांगोळी यांचा समावेश होता. हे साहित्य मोखाडा येथील आदिवासी आश्रम शाळांना वितरित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर श्रीहरी पवळे यांचे वडील ह.भ.प. अप्पासाहेब गणपतराव पवळे यांची ही कडधान्याने तुला करण्यात आली. या कडधान्याचे वितरण नाका कामगारांसाठी करण्यात येणार आहे. श्रीहरी यांनी सन्मानाचा स्वीकार करून फक्त हे कला साहित्य आश्रम शाळांना न देता, स्वतः या शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना कलेचे धडे देण्याचा मनोदय व्यक्त केला. या कार्यक्रमासाठी श्रीहरी पवळे यांचे नातेवाईक प्राध्यापक मधुकर वारभुवन, प्राचार्य रवींद्र पाटील, कवी रुद्राक्ष, कवी शंकर गोपाळे उपस्थित होते. प्रभात ट्रस्टचे अध्यक्ष डॉक्टर प्रशांत थोरात ट्रस्टचे विविध उपक्रम याविषयी माहिती सांगितली. पिता- पुत्राची तुला एकाच दिवशी करून प्रभातने नव्या पिढीसमोर एक आदर्श निर्माण केला आहे.